२२) बांधकामाच्या साहित्याची अशा तऱ्हेने व्यवस्था करावी जेणेकरून त्यामुळे ड्रेन, पावसाचे पाणी व वाहतुक इ. ना अडथळा निर्माण होणार नाही. यामुळे अडथळा निर्माण झाल्यास विशेष नियोजन प्राधिकरण तर्फे कायदेशीर कार्रवाही करण्यात येईल. विशेष नियोजन प्राधिकरणाचे पूर्व परवानगी शिवाय सार्वजनिक रस्त्यावर बांधकाम साहित्य ठेवता येणार नाही. मात्र, नियमानुसार Stacking Charges चा भरणा करुन विशेष नियोजन प्राधिकरणाकडून परवानगी घेता येईल.

२३) जर नकाशात दर्शविलेल्या गणनपत्रकात / आकडेमोड (कॅलक्युलेशन्स) मध्ये विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींशी विसंगत अशी चुक / दोष आढळल्यास, ईमारतीचा / बांधकामाचा तो भाग जो नियमात बसत नाही तो अनधिकृत समजण्यात येईल. याबाबत विशेष नियोजन प्राधिकरण (म्हाडा) चंद्रपूर चा निर्णय अंतिम राहील.

२४) विशेष नियोजन प्राधिकरण (म्हाडा) चंद्रपूर चे संबंधीत अधिकारी यांचे पडताळणी करिता ईमारतीचे बांधकाम सुरू असतांना मंजुर बांधकाम नकाशे नेहमी साईटवर उपलब्ध ठेवावेत.

२५) नियमानुसार मागणी प्रमाणे विकास शुल्क व सेवाशुल्काचा भरणा करणे अर्जदार व भूखंडधारकास बंधनकारक राहील.

२६) रहिवासी वापरासाठी रु. ५/- प्रति चौ. मी. या प्रमाणे निव्वळ भुखंड क्षेत्राकरीता जमीन मालक यांनी सेवा अधिकार (Service Charge) चा भरणा करावा लागेल. वरील प्रमाणे सेवा अधिभार हा प्रत्येक कॅलेंडर वर्षाकरीता असून अर्जदाराचे विनंती अर्जाचे दिनांकापासुन तीन वर्षाचे कालावधी नंतर सेवा अधिभार प्रत्येक वर्षाचे १५ जानेवारी पर्यंत भरणा करणे आवश्यक राहील. या दिनांकापासून तीन वर्षाचे कालावधी नंतर सेवा अधिभाराचा भरणा न केल्यास विलंब कालावधीचे प्रथम सहा महिन्याकरीता २१% प्रतिवर्ष प्रमाणे व त्या पुढील कालावधी करीता २५% प्रती वर्ष अतिरीक्त विलंब देयभार (Delayed payment charges) भरणा करावा लागेल. सेवा अधिभाराचे दर म्हाडा/प्राधिकरणाने बदल करण्याचे स्वेच्छा अधिकाराचे अधिन असतील.

२७) नवीन चंद्रपूर या अधिसुचित क्षेत्राकरीता लागु प्रमाणित इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीतील संपुर्ण तरतुदी विकासकर्त्यास बंधनकारक राहतील.

२८) वरील अटी व शर्ती पैकी कोणत्याही अटींचा अगर शर्तीचा भंग केल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात येईल.

२९) सदर भुखंड ३०मी रुंदीचे रस्त्यालगत असुन प्रा. चे पत्र क्रं. ४६७ दि. ८/२/१६ चे पत्राचे अनुषंगाने नकाशाला प्लिंथ लेव्हल पर्यंतच्या बांधकामाची तात्पुरती परवानगी देण्यात येत आहे मात्र म्हाडातर्फे तयार करण्यात येणाऱ्या आर्किटेक्चर कंट्रोल बाबतच्या प्रस्तावित नियम व अटी पाळून अर्जदारास पुढील परवानगी घ्यावी करावे लागेल.

✓सहपत्र :- मंजूर नकाशा (द्विप्रती)

Rawww

सहायक संचालक नगर रचना,
विशेष नियोजन प्राधिकरण(म्हाडा),
चंद्रपूर.